


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २ आक्टोबर १९४६ अंक ४०

★ वृद्धापकाळची तरतूद
★ कुटुंबाचें संरक्षण
★ मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न

हे सर्व प्रश्न आयुष्याचा विमा उतरल्यानेंच सुटूं शकतात. तरी आपला विमा
पुणें येथील सुप्रसिद्ध

## कॉमनवेल्थ
## ॲशुअरन्स कंपनी लि.

मध्येंच उतरा.


—सर्वत्र एजंट्स नेमणें आहेत.—

खालील पत्त्यावर लिहा अगर भेटा

अध्यक्षः—ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर

श्री. म. जोशी,
मॅनेजिंग डायरेक्टर

अ



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेटस

हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड

डिस्टिलरी लवकरच सुरू होणार

ठराविक मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात

कॅपिटल कंट्रोल ऑर्डर १४/अ अन्वयें दिलेल्या सवलतीनुसार आरंभापैकीं उरलेले

दोन लक्षांचे ६ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स विक्रीस काढले आहेत.

कृष्णा कित्तूर, जि. बेळगांव } विंचूरकर आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस.

अधिक माहिती—रा. डी. एच. बेडेकर

सरदार विंचूरकरांचा वाडा, सदाशिव पेठ, पुणें २ यांचेकडून मिळेल.

## साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्हीं सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी.

## " अर्था " चा दिवाळी अंक

दर वर्षीप्रमाणें, " अर्था " चा दिवाळीचा मोठा अंक चालू वर्षीहि प्रसिद्ध होईल. ता. १६ ऑक्टोबरचा अंक दिवाळी अंक म्हणून निघेल आणि त्यानंतरचा अंक ता. ६ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.

## विविध माहिती

**साखरेचे २० नवे कारखाने निघणार**—हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या शुगर पॅनेलनें, साखर कारखान्यांचें साखरेचें उत्पादन सध्यां १०,८४,००० टन आहे तें १८,५०,००० टनापर्यंत वाढविण्यांत यावें असें सुचविलें आहे. ह्या आकड्यांत निर्गतीचाहि समावेश होतो. सध्यांचे कारखाने वाढवून व नवे साखर कारखाने स्थापन करून उत्पादनांत नियोजित भर घालतां येईल. नव्या कारखान्यांच्या स्थापनेस संमति देण्यांत यावयाची आहे त्यांत बंगाल व मुंबई ह्यांच्या वांट्यास प्रत्येकीं तीन कारखाने व आसाम, बिहार, सरहद्द प्रांत, ओरिसा, सिंध, बडोदें, हैद्राबाद व त्रावणकोर ह्यांच्या वांट्यास प्रत्येकीं एक याप्रमाणें नवे कारखाने आले आहेत. प्रत्येक कारखान्याची ऊंस गाळण्याची शक्ति रोजीं ८०० ते १,००० टन राहील. २,५०,०० टनांच्या उत्पादनासाठी आणखी २५ कारखाने स्थापावे लागतील त्यांची मोंतवार वाटणी मागाहून केली जाईल

**संयुक्त राष्ट्रसंघटनेचा नोकरवर्ग**—संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या कचेरींतील २ ते ३ हजार जागांसाठी २७,००० अर्ज आले होते. संघटनेचें काम नीट मार्गास लागलें, म्हणजे सुमारें ४ हजार लोकांची नेमणूक करावी लागेल. त्यांपैकी २½ हजारांची नेमणूक डिसेंबर १९४६ पूर्वी होईल. सध्यांच्या १,३५० नोकरांपैकीं बहुतेक अमेरिकनच आहेत. वास्तविक सर्व देशांच्या नागरिकांत ह्या जागा योग्य प्रमाणांत वाटल्या गेल्या पाहिजेत, असें संघटनेचा करारच सांगत आहे. नवीन घेण्यांत येणारे नोकर वेगवेगळ्या देशांतून आलेले आहेत.

**एकत्रीकरण**—जी. आय. पी. व बी. बी. अँड सी. आय. रेल्वेजच्या मसिद्धि कचेऱ्यांचें एकत्रीकरण करण्यांत आलें आहे.

**अॅटम बॉंब आणि शास्त्रज्ञ**—"शास्त्रज्ञांनीं अॅटम बॉंबच्या निर्मितींत सहकार्य नाकारावयास हवें होतें. बिकिनी बेटावरील अॅटम बॉंबच्या प्रयोगावर अमेरिकेनें ३ कोटी डॉलर्स खर्चले हा केवढा संपत्तीचा नाश होय!"—सर सी. व्ही. रामन ह्यांचें अॅटम बॉंबवरील मत.

**फोर्ड गाड्यांची किंमत**—फोर्ड मोटार गाड्यांच्या किंमती ६% वाढविण्यांत आल्याचें न्यू यॉर्कचें वृत्त आहे.

**कोयना नदीचे पाण्यावर वीज-निर्मिती**—सातारा जिल्ह्यांत कोयना नदीवर वीज निर्माण करण्याच्या शक्यतेचा विचार मुंबई सरकार करीत आहे.

**जर्मनीमधील संस्कृत ग्रंथ**—हिंदुस्थानांतून कित्येक संस्कृत ग्रंथ व हस्तलिखित पोथ्या हीं जर्मनांनीं विकत घेऊन जर्मनींत नेलीं होतीं, त्यांवर जप्ती आणणें नुकसान-भरपाईच्या-शाखास धरून नाहीं. जर्मनांनीं ज्यांची लूट केली होती, अशाच जिनसा फक्त जप्त करतां येतात आणि मूळ देशाकडे त्या परत धाडता येतात. बर्लिनमधील हिंदी लष्करी मिशनचे प्रमुख, मेजर जनरल डी. स्टुअर्ट ह्यांनीं संस्कृत ग्रंथ मिळविण्यासाठीं प्रयत्न चालविला आहे आणि योग्य किंमतीस ते विकत घेण्याचें त्यांचें धोरण आहे. पुरेसे ग्रंथ जमले, म्हणजे हिंदी पंडितांना जर्मनींत नेऊन त्या ग्रंथांतून महत्त्वाचे ग्रंथ निवडण्याचें काम सांगण्यांत येईल.

**ब्रिटिश रेडिओची हिंदुस्थानांत जाहिरात**—मंगळवार, ता. २४ सप्टेंबर रोजीं रेमंड इलेक्ट्रिक कंपनी ह्या ब्रिटिश कंपनीनें हिंदी संस्थांतील प्रत्येक खेड्यास पांच व्हॉल्व्हचा रेडिओ सेट बक्षीस दिला.

**टाटा कंपनीची कामगारांच्या मागण्यांस मान्यता**—टाटा कंपनी व तिचे कामगार ह्यांचेमधील वाटाघाटी संपून दोघांत समेट झाला आहे. कामगारांच्या नव्या मागण्यांमुळें कंपनीस २ कोटि रुपये खर्च येणार आहे.

**दि प्रिन्सेस पिक्चर्स कॉर्पोरेशन लि.**—एक कोटि भांडवलाची वरील कंपनी स्थापन झाली आहे. थंड हवेच्या सोईचीं २४ थिएटरें, ३ नाटक कंपन्या, ६० चित्रपट, इत्यादींच्या योजना कॉर्पोरेशननें तयार केल्या आहेत.

**कोयनेलच्या किंमती**—१ सप्टेंबर १९४६ पासून कोयनेल (क्विनिन सल्फेट) च्या गोळ्यांची किंमत सरकारी नियंत्रित दराप्रमाणें पांच ग्रेनच्या एक हजार गोळ्यांना ३१ रु. ८ आणे व शंभर गोळ्यांना २ रु. ३ आणे ठरविण्यांत आली असून दोन ग्रेनच्या एक हजार गोळ्यांना ९ रु. ४ आणे व शंभर गोळ्यांना १५ आणे ठरविण्यांत आली आहे. पोस्ट ऑफिसांतील विक्रीसाठी, पांच ग्रेनच्या दोन गोळ्यांच्या पाकिटाला पांच पैसे आणि दोन ग्रेनच्या तीन गोळ्यांच्या पाकिटास तीन पैसे किंमत ठेवण्यांत आली आहे.

**मध्यप्रांत सरकार विमान खरीदणार**—आपले मंत्री व अधिकारी ह्यांना अधिक वेगानें प्रवास करतां यावा, म्हणून मध्यप्रांत सरकार एक विमान विकत घेणार आहे.

**भुईमुगाच्या पेंडीचा अन्नाकडे उपयोग**—भुईमुगाची पेंड दळून तिचें पीठ अन्न म्हणून वापरण्यांत यावें, अशा सूचना दुष्काळावर उपाय म्हणून करण्यांत आल्या होत्या. बंगलोर येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या प्रयोगशाळेंत त्यासंबंधी संशोधन करण्यांत आलें, त्याचा निष्कर्ष आतां प्रसिद्ध झाला आहे. अन्न ह्या दृष्टीनें पेंडीचा उपयोग करणें इष्ट नाहीं, असें प्रयोगशाळेचें मत आहे. इतर प्रकारच्या पेंडी अन्न ह्या दृष्टीनें ज्यास्त उपयुक्त ठरतील. तरी पण, त्यांतील अन्नाचा अंश मनुष्याच्या शरिरांत भिनावा ह्या दृष्टीनें त्यांचेवर योग्य त्या क्रिया आधी कराव्या लागतील.

**साखरेंतील कपात कमी होण्याचा संभव**—१९४५ सालीं हिंदी साखरेच्या उठावांत १३% कपात केली, ती ८% वर आणणें शक्य झालें तरी मार्च १९४७ च्या आधी घाईनें तसें करणें श्रेयस्कर होणार नाहीं, असें शुगर कंट्रोलरनें जाहीर केलें आहे. येत्या हंगामांत साखरेचें उत्पादन सुमारें १०½ लक्ष टन होईल अशी अपेक्षा आहे.

**ओरिएंटलचा बोनस**—ओरिएंटल विमा कंपनीनें, १९४५ अखेरच्या तीन वर्षांकरितां हयातीनंतरच्या विम्यास व हयातींतील विम्यास वार्षिक दर हजारी अनुक्रमें १० रु. व ८ रु. बोनस जाहीर केला आहे. कंपनीच्या मूल्यमापनांत १,७६,७७,१०७ रु. नफा आढळून आला.

**कोहिनूर हिरा परत आणा**—कोहिनूर हिरा हिंदुस्थानांत परत आल्याविना हिंदुस्थान स्वतंत्र झाला असें म्हणतां येणार नाहीं, असें सर सी. व्ही. रामन ह्यांनीं सिलोनमधील आपल्या एका भाषणांत सांगितलें. हा सुप्रसिद्ध हिरा गोवळकोंडें येथें प्रथम सांपडला तेव्हां त्याचें वजन १८६ कॅरट होतें. १८४९ सालीं इंग्रजांनीं पंजाब घेतल्यावर तो ईस्ट इंडिया कंपनीचे मार्फत व्हिटोरिया राणीकडे गेला. ब्रिटिश राजाच्या मुकुटास तो आतां भूषवीत आहे.

**चांदीच्या नाण्यांऐवजी निकेलची नाणीं**—ग्रेट ब्रिटनमधील सध्यांचीं चांदीचीं नाणीं रद्द करून त्याऐवजीं निकेलचीं नाणीं प्रसृत करण्यांत येणार आहेत. चांदी महाग असल्याकारणानें तिची बचत करणें आवश्यक झालें आहे. हिंदुस्थान सरकारनें चांदीची बचत करण्यास ह्याचे आधीच प्रारंभ केला आहे.

**निवडणुकीसाठीं पेट्रोल**—सिंध असेंब्लीच्या येत्या निवडणुकीसाठी उमेदवारांना पेट्रोल सर्वांचें लागेल त्याकरितां सिंध सरकारनें हिंदुस्थान सरकारकडून १,६०,००० गॅलन पेट्रोल मागून घेतलें आहे. प्रत्येक उमेदवारास २०० गॅलन पेट्रोल मिळणार आहे.

**इंडियन बँक्स असोसिएशन**—वरील संस्थेची स्थापना मुंबई येथें ता. २६ सप्टेंबर रोजीं झाली. सर एच. पी. मोदी हे तिचे अध्यक्ष व श्री. प्राणलाल देवकरण नानजी हे उपाध्यक्ष आहेत.

**मॅनेजिंग एजन्सीचा करार**—इंडिया युनायटेड मिल्स लि. व तिचे मॅनेजिंग एजंट्स ह्यांचा २० वर्षांचा नवा करार झाला आहे त्याप्रमाणें मॅनेजिंग एजंटांना दरसाल किमान १,२०,००० रुपये मिळावयाचे आहेत. वार्षिक नफ्याच्या ७½% हिस्साहि त्यांस मिळेल.

# अर्थ

बुधवार, ता. २ आक्टोबर १९४६




संस्थापक

प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ४ रु. किरकोळ अं. २ आणे.


## मजूर व मालक यांचे संबंध

युद्धोत्तर हिंदुस्थानांत जे अनेक बिकट प्रश्न उत्पन्न होत आहेत त्यांत मजूर व मालक यांच्यांतील औद्योगिक संबंध कशा प्रकारचे असावेत हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. हिंदी सरकार काळ्या–गोऱ्या नोकरशाहींतून भरणा केलेले असतांना हे संबंध ज्या तत्त्वावर निर्णीत झाले होते त्या तत्त्वाप्रमाणें आतां ते निर्णीत करणें बरोबर होणार नाहीं. हिंदी लोकमताला जबाबदार असें मध्यवर्ती सरकार अधिकारपदावर आलें असल्यानें याबाबतींत जनतेच्या अपेक्षा पूर्वीपेक्षा अगदी वेगळ्या स्वरूपाच्या आहेत हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. मुंबईचें सरकार हे संबंध ठरविणारा एक कायदा करणार आहे. इतर प्रांतांतही याच प्रकारचे कायदे लवकरच करावे लागतील, आणि प्रांतिक कायद्यांच्या अंमलबजावणीचा अनुभव जमेस धरून, मध्यवर्ती सरकारलाही सर्व हिंदुस्थानला लागू असणारा अशा प्रकारचा कायदा पुढें मागें केल्याशिवाय भागणार नाहीं.

कोठल्याही देशाचें औद्योगीकरण व्यक्तींच्या अगर व्यक्तिसमुदायाच्या खाजगी पुढाकाराच्या ओढीनें होत असलें म्हणजे त्यांत मजूर–मालकांचे झगडे होणें अपरिहार्यच असतें. अशा प्रकारच्या झगड्यांत राज्यसंस्थाने हमींच मालक–वर्गाची बाजू कळत न कळत घेत असते. परंतु यापुढील काळांत राज्यसंस्थांना ही आपली भूमिका थोड्याबहुत प्रमाणावर सोडावी लागणार आहे. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या देशांच्या औद्योगीकरणाचा इतिहास पाहिला तर अनिच्छेनें कां होईना पण त्या त्या देशांतील राज्यसंस्थांना मजुरांचे हितसंबंध रक्षण करण्याकरितां कायदे करावे लागले आहेत असें दिसून येतें. मजूर वर्गाकडून अनिर्बंधपणानें काम करून घेण्यानें संप, उत्पादनांत घट, कार्यक्षमतेची हानि इत्यादी अनिष्ट परिणाम घडून येतात. यासंबंधीं सर्व सुज्ञ अर्थशास्त्रज्ञांचें एकमत आढळून येतें. या दृष्टीनें पाहातां टाटा–कामगार–संघ व टाटा आयर्न अँड स्टील कंपनी ह्यांचे दरम्यान नुकतीच जी तडजोड झाली ती निःसंशय अनुकरणीय आहे. तडजोडीच्या अटींप्रमाणें, घसारा, कर, नफावाटणी इत्यादी सार्‍यांच्या हिशेबाची रक्कम बाजूला काढण्यांत आल्यावर २२½ टक्के नफा कामगारांत वाटण्यांत येणार आहे. कंपनीनें कामगारांच्या रहाण्याची सोय करण्यासाठी पुढील दोन वर्षांत ३,५०० छोटीं घरें बांधण्याचें ठरविलें आहे. शिवाय ज्या कामगारांना खाजगी घरें बांधावयाचीं असतील त्यांना जमीन देण्यांत येऊन घराच्या किंमतीच्या ७५ टक्के पण रु. ७,५०० पेक्षा अधिक नाहीं इतकें कर्जही १० वर्षांत फेडण्याच्या करारानें देण्यांत येणार आहे. अर्थात् या सवलतीचा उपयोग कामगार–वर्गांतील उच्च श्रेणीचे पगार ज्यांना मिळत असतील त्यांनाच घेतां येईल हें उघडच आहे. वेतनाच्या श्रेणीही ठरविण्यांत आल्या असून रोजीं १ रुपयापासून तें १४ रुपयांपर्यंत या निरनिराळ्या श्रेणींचा विस्तार आहे. पूर्वी ज्या कामगारांना १० आणे किंवा १५ आणे रोज मिळत असे त्यांना आतां १ रुपया रोज मिळूं लागेल. याशिवाय उत्तम अगर अधिक कामाबद्दलचें बोनस व नियमितपणें हजर रहाण्याचें बोनसही कामगारांना देण्यांत येणार आहे.

या तडजोडीच्या अटींपेक्षां ज्या वृत्तीनें ही तडजोड करण्यांत आली तिला अधिक महत्त्व आहे. कामगारांना कंपनीच्या फायद्यांत जो हिस्सा देण्यांत आला आहे तो टाटा कंपनीच्या मक्तेदारी स्थितीमुळेंच देणें शक्य झालें आहे. ज्यां औद्योगिक कंपन्यांची टाटाइतकी सुस्थिति नसेल त्यांना ही योजना कितपत स्वीकारतां येईल हा प्रश्नच आहे. तडजोडीच्या अटींत साध्या कामगाराला कुशल कामगार बनण्याविषयीं जें प्रलोभन असावें लागतें तें दिसत नाहीं. ज्यांना आपलें कौशल्य वाढविण्यासाठीं शिकण्याची इच्छा असेल त्यांना योग्य त्या सवलती व शिकून तयार झाल्यावर वरच्या वाढत्या श्रेणीचा पगार मिळेल अशी तरतूद करणें कार्यक्षमता व कामांत मन लागण्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे. ज्या कंपन्यांना प्रागतिक धोरण स्वीकारणें शक्य असेल त्यांनीं टाटा कंपनी इतपत तडजोडीची वृत्ति स्वीकारल्यास मालक–मजुरांचा संघर्ष मावळण्याच्या, निदान कमी कडवट होण्याच्या, मार्गाला लागेल यांत शंका नाहीं.

---

## हिंदी संस्थानें व उद्योगधंदे

हिंदी संस्थानांतील शास्ते आणि शासित जनता, दोघेही ब्रिटिश हिंदुस्थानाशीं तुलना करतांना मागासलेले आहेत ही गोष्ट खरी; पण 'मागासलले' या शब्दाचा अर्थ राजकीय दृष्ट्या मागासलेले अशा व इतक्याच मर्यादित अर्थानें बहुधा करण्यांत येतो. वास्तविक संस्थानांमधील प्रगती रेंगाळण्याचें खरें कारण तेथील जुनाट अर्थव्यवस्था हें आहे. संस्थानांतील उद्योगधंद्यांचें मागासलेपण पुढील कांहीं आकड्यांवरून अधिक तपशीलवार लक्षांत येतें. १९३९ सालीं संस्थानें व ब्रिटिश हिंदुस्थान ह्यांच्यांतील मोठ्या उद्योगधंद्यांची संख्यावारी पुढीलप्रमाणें होती:—

| धंद्याचें नांव | ब्रिटिश हिंदुस्थान | हिंदी संस्थानें |
|---|---|---|
| साखरेचे कारखाने | १५३ | १३ |
| आगपेटींचे ,, | ८५ | २८ |
| कागदाचे ,, | १४ | २ |
| रसायनांचे ,, | ३१ | ७ |
| कांचेचे ,, | ७३ | ६ |
| सिमेंटचे ,, | १३ | ६ |

हिंदी संस्थानांत हिंदुस्थानांतील एक चतुर्थांश लोक रहात असले तरी त्यांत कामगारांची संख्या १९३९ सालीं अवघी २ लाख होती. ब्रिटिश हिंदुस्थानांत ही संख्या २० लाख होती. हिंदुस्थानच्या घटनेच्या नव्या बनावांत संस्थानें सामील होतात कीं नाहीं हें अद्याप ठरावयाचें आहे. हिंदी संस्थानांनीं हिंदुस्थानच्या संयुक्त राज्यांत सामील न होण्याचें ठरविलें तर हिंदी राष्ट्राचीं केवळ राजकीयच छकलें होतील असे नव्हे, तर हिंदी संयुक्त सरकारच्या औद्योगिक योजनेंतहि त्यामुळें बिकट अडथळे उत्पन्न झाल्याशिवाय रहाणार नाहींत. सर्व हिंदी जनतेच्या रहाणीचें मान सुधारावयाचें असलें तर संस्थानांनींहि अशा योजनेशीं सहकार्य केलें पाहिजे हें उघडच आहे. तसें झालें नाहीं तर ब्रिटिश हिंदुस्थानांतील भांडवल संस्थानांत अधिक प्रमाणांत गुंतूं लागेल; आणि त्यामुळें अखिल भारतीय स्वरूपाच्या औद्योगिक योजनांना पुरेसें भांडवल मिळण्यास कठीण जाईल. पण संस्थानें हिंदी संघ राज्यांत सामील झालीं असें धरून चाललें तरी सुद्धां नियोजनाचा प्रश्न सहजगत्या सुटेल असें मानण्याचें कारण नाहीं. मोठाल्या धंद्यांच्या विकेंद्रीकरणाच्या नांवाखालीं ब्रिटिश हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांच्या वाढीकडे दुर्लक्ष होण्याचा संभव आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवून भावी हिंदी संघराज्याला आपला आर्थिक कार्यक्रम आंखावा लागेल.

---

## पुण्यांत क्लिअरिंग हाउसची पूर्व तयारी !

पुण्यामध्यें क्लिअरिंग हाउस स्थापन होण्याची आवश्यकता आज कित्येक वर्षें तीव्रतेनें भासत आहे. परंतु त्या संबंधांत प्रत्यक्ष कृति मात्र कांहींच दिसत नव्हती. इंपीरिअल बँकेनें त्याबाबत आतां हालचाल करण्यास प्रारंभ केलेला दिसतो. कारण, तिनें पुण्यांतील शेड्यूल्ड बँकांकडून, त्यांची इतर शेड्यूल्ड बँकांशीं रोजची चेकची देवघेव किती होते, ह्याची आकडेवार तुलनात्मक माहिती मागविली आहे, असें समजतें. पुण्यांत क्लिअरिंग हाउस स्थापन झाल्यास, त्याचें सभासदत्व शेड्यूल्ड बँकांपुरतेंच मर्यादित होणार काय ? इतर बँकांनीं त्या बाबतींत जागरूक राहून आतांपासूनच आपल्या सोईकडे लक्ष पुरविणें योग्य होईल.

---

# स्फुट विचार

## हिंदी रुपयांचें पौंडाशीं असलेलें लग्न मोडण्याची संधि

इंटर नॅशनल मोनेटरी फंडाच्या कराराप्रमाणें फंडांत सामील होणाऱ्या सर्व राष्ट्रांनीं आपल्या चलनाची, २८ ऑक्टोबर १९४५ रोजींच्या हुंडणावळीच्या दरावर आधारलेली, सम (par) किंमत फंडाच्या कचेरीस कळवावयाची आहे. ही किंमत त्या त्या राष्ट्रीय चलनाची सम किंमत समजली जाईल. परंतु ९० दिवसांचे आंत एकाद्या सभासद राष्ट्रानें ही सम किंमत चुकीची आहे असें फंडाच्या कचेरीस कळविलें किंवा फंडाच्या कचेरीनें ही किंमत अव्यवहारार्य असल्याचें त्या सभासद राष्ट्रास कळविलें, तर त्या किंमतीची तपासणी व्हावी लागेल. ही ९० दिवसांची मुदत १२ डिसेंबर १९४६ रोजीं संपत आहे. म्हणजे हिंदुस्थान सरकार रुपयाची जी सम किंमत फंडाच्या कचेरीस कळवील, ती बदलण्याची मागणी फंडानें किंवा हिंदुस्थानानें ह्या दिवसापूर्वी केली पाहिजे. ह्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नावर हितसंबंधी लोकांकडून सरकारनें सूचना मागविल्या आहेत त्या सरकारकडे ३१ ऑक्टोबर १९४६ पूर्वी पोंचल्या पाहिजेत. रुपयाचें ब्रिटिश पौंडाशीं झालेलें लग्न मोडून रुपयास स्वतंत्र दर्जा प्राप्त करून देण्याची आतां नामी संधि प्राप्त झाली आहे. रुपयाची सम किंमत कोणत्या तत्त्वावर आणि किती किंमतीवर निश्चित करावी, हे प्रश्न येथें उपस्थित होतात. डॉलर सोन्यावर आधारलेला आहे आणि स्टर्लिंगची किंमत डॉलरशी जोडलेली आहे. तेव्हां रुपया-स्टर्लिंगचें नातें हें रुपया-सोन्याच्या नात्याप्रमाणेंच आहे असें म्हणतां येणार नाहीं, असें सांगून रुपयाची किंमत सोन्याशीं प्रत्यक्षपणें निश्चित करावी, असें सर चुनीलाल भाईचंद मेथा ह्यांनीं सुचविलें आहे. ३५ डॉलर = १ औंस सोनें, ४·०३ डॉलर = १ स्टर्लिंग पौंड आणि १ रुपया = १८ पेन्स स्टर्लिंग ह्या हिशेबानें १ रुपया = ४·१४ ग्रेन सोनें असा हिशेब होतो. रुपयाची किंमत किती ग्रेन सोनें ठरवावी, हा प्रश्न स्वतंत्र असला तरी आजच्या हुंडणावळीच्या आधारावर ती किंमत किती होतें, हें वरील आकडे दर्शवितील.

---

## "हिंदी कपाशीची किंमत वाढवा"

हिंदी कपाशीची नियंत्रित कमाल किंमत वाढविण्याचें अगत्य ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशननें हिंदुस्थान सरकारास पटविण्यासाठीं एक पत्र पाठविलें आहे. जागतिक किंमती एकसारख्या वाढत चालल्या असतांना हिंदी कपाशीची किंमत उलट कमी करण्यांत आली आहे त्या कारणानें हिंदी कपाशीस बाहेर देशांत मोठी मागणी निर्माण झाली आहे. हिंदुस्थानांतील अंतर्गत किंमतीपेक्षां चीनकडे निर्गत झालेल्या कपाशीनें प्रत्येक खंडीस १०० ते २८० रुपये जास्त मिळविले, असें म्हणतात. कपाशीचें क्षेत्र मर्यादित करून धान्याचें उत्पादन वाढविण्याचें धोरण योग्य असलें तरी २० लक्ष गाठी कपास कमी झाली कीं १ कोटि, ९० लक्ष मण सरकी कमी मिळते आणि सरकी हें जनावरांचें उत्कृष्ट अन्न आहे, असें असोसिएशनचें म्हणणें आहे. इतर देशांतील शेतकऱ्यांना कपाशीच्या लागवडीपासून जें उत्पन्न मिळतें त्याच प्रमाणांत हिंदी शेतकऱ्यांसहि मिळावें, ह्या दृष्टीनें सध्याची हिंदी कपाशीची किंमत १०० रुपयांनीं तरी वाढवावी अशी असोसिएशनची सूचना आहे. कपाशीखालील क्षेत्र व कपाशीची निर्गत ह्याबाबत सरकारनें एक निश्चित धोरण आंखावें असेंहि असोसिएशननें सुचविलें आहे. हिंदी गिरण्यांसाठी विदेशी कपाशीची किती आयात होऊं द्यावी, हेंहि सरकारला ठरवावें लागेल.

---

## हिंदुस्थानांत ब्रिटनचा हाय-कमिशनर

हिंदी राष्ट्रीय मध्यवर्ती सरकार अस्तित्वांत आल्यावर ब्रिटनच्या हिंदुस्थानमधील व्यापारी हितसंबंधाकडे लक्ष पुरविण्यासाठी हाय-कमिशनर नेमण्यांत येणार असल्याची. बोलवा मि. शॉन यांची नेमणूक जाहीर होण्यापूर्वीच उठली होती. मि. शॉन, त्यांचे दुय्यम मदतनीस व इतर इंग्रज नोकर वर्ग मिळून १५ ते २० लोकांची एक कचेरी नव्या दिल्लींतील अल्बुकर्क रोड येथें उघडण्यांत येणार आहे. मि. शॉन हे नोव्हेंबर संपण्यापूर्वीच आपलें काम पाहूं लागतील असा अंदाज करण्यांत येत आहे. हिंदी राष्ट्रीय सरकारशीं होणाऱ्या व्यवहारांत गव्हर्नर जनरल हा ब्रिटिश सरकारचा राजकीय घटनात्मक प्रतिनिधी म्हणून राहीलच. तथापि हिंदुस्थानांतील बदललें वातावरण लक्षांत घेऊन ब्रिटनच्या आर्थिक व सांस्कृतिक हितसंबंधांची काळजी घेण्यासाठीच मि. शॉन यांची मुद्दाम नेमणूक करण्यांत आली आहे. हिंदी राज्यघटनेचा प्रश्न कोणत्या तरी रीतीनें सुटल्यावर येणाऱ्या नव्या सरकारनें ब्रिटिश व्यापाराला धक्का देण्यासारखे पक्षपाती कायदे केले तर मोठीच पंचाईत उत्पन्न होईल असें ब्रिटिश व्यापारी वर्गाच्या हिंदुस्थानांतील प्रतिनिधींना वाटत आहे. सध्या प्रचलित असणाऱ्या घटना कायद्यांत अशा प्रकारचे कायदे करण्याच्या मार्गांत मुद्दाम अडथळे ठेवलेले आहेत. या प्रकरणांत मध्यवर्ती असेंब्लीचे एक सभासद श्री. मनू सुभेदार यांनीं हिंदी उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें केलेली कामगिरी सर्वश्रुतच आहे. नव्या घटनेच्या प्रस्थापनेनंतर, ब्रिटिश व्यापाराला धक्का लागूं देऊं नये येवढेंच एक महत्त्वाचें कार्य मि. शॉन यांना करावयाचें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. या कार्यांत यश येणें न येणें हे अर्थात् हिंदी भांडवलदारांच्या राष्ट्रीय वृत्तीच्या कणखरपणावर अवलंबून आहे.

---

## साखरेच्या कारखान्यांस महाराष्ट्रांत अनुकूलता

मुंबई प्रांत साखरेच्या उत्पादनास विशेष अनुकूल कसा आहे, हें दायके कमिटीनें आपल्या अहवालांत नमूद केलें आहे. मुंबई प्रांतांतील कालव्यांमुळें उंसास भरपूर पाणी मिळूं शकतें, ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. महाराष्ट्रांतील उसास ३० ते ३५ वेळा पाणी मिळूं शकतें; संयुक्त प्रांताच्या पश्चिम भागांत पाऊस पुष्कळ पडतो व उसास ७ ते ८ वेळाच पाणी मिळतें. मुंबई प्रांतांतील दर एकरीं उसाच्या पिकाइतकें पीक हिंदुस्थानांत इतरत्र कोठेंहि येत नाहीं. कांहीं कारखान्यांच्या मळ्यांत तें दर एकरीं ६० टन पडतें. शेतकऱ्यांनीं केलेल्या मळ्यांतील उत्पादन १५ ते २५ टन इतकेंच आहे. कालव्याखालील जमीन उसाच्या पिकास अत्यंत अनुकूल आहे व तिची तुलना जावा, क्यूबा, इत्यादि ठिकाणच्या जमिनींशीं करतां येईल. संयुक्त प्रांत किंवा बिहार येथील जमीन इतकी चांगली नाहीं. तथापि, मुंबई प्रांतांत उंस करण्यास खर्च मात्र अधिक येतो, कारण जमीनीस पुष्कळ खत घालावें लागतें आणि पाणीपट्टीहि मोठी असते. परंतु, उताऱ्याच्या दृष्टीनें मुंबई प्रांताचा अनुक्रम पहिला लागतो. संयुक्त प्रांत किंवा बिहार ह्यांपेक्षा मुंबई प्रांतांतील ऊस गाळण्याचा हंगाम दीर्घ काल चालतो. विशेषतः महाराष्ट्रांतील पाटाखालील क्षेत्रांत ऊस गाळण्याचें काम सप्टेंबर ते जून, १० महिने चालू असलें तरी साधारणतः ७५% उंस नोव्हेंबर ते एप्रिल ह्या मुदतींत गाळला जातो. अशा रीतीनें, उसाच्या लागवडीस व साखरेच्या उत्पादनास मुंबई प्रांत व त्यांतील कालव्याखालील महाराष्ट्र विशेष सोईचा आहे आणि फाजील उत्पादनाची भीति न बाळगतां मुंबई प्रांतानें उसाच्या क्षेत्राचा विस्तार करून साखरेचें उत्पादन वाढवावें असा दायके कमिटीचा सल्ला आहे. मुंबई बंदरांतून मध्यपूर्वेकडे साखर निर्गत करणें सोईचें होईल, असेंहि समितीनें सुचविलें आहे

---

## हिंदी जननसंख्या वाढली

हिंदुस्थान सरकारच्या पब्लिक हेल्थ कमिशनरनें १९४५ मधील ब्रि. हिंदुस्थानांतील आरोग्यावरील आपला रिपोर्ट तयार केला आहे. त्यावरून, १९४४ चे मानानें १९४५ सालीं हिंदुस्थानांतील जननाचें प्रमाण वाढलेलें दिसून येतें. ह्यापूर्वीच्या कांहीं वर्षांत जननाचें प्रमाण उतरत चाललेलें होतें. १९३१-४१ ह्या मुदतींत तें दर हजारीं ३४ होतें, तें १९४१ सालीं २९ झालें व १९४३ व १९४४ मध्यें तर तें २६ वर उतरलें. बहुतेक सर्व प्रांतांतच जननाचें प्रमाण उतरत गेलें. जननाची उतरती संख्या ही एक निश्चित प्रवृत्ति आहे का ती एक तात्कालिक बाब आहे, हें सांगतां येणें कठीण आहे, असें रिपोर्ट म्हणतो. १९४५ ची १९४४ शीं तुलना केली, तर सरहद्दप्रांत, सिंध, मद्रास व मुंबई ह्या प्रांतांत जननाचें प्रमाण कमी झालेलें आढळतें. कुर्ग व पंजाब ह्यांनीं १९४४ मधील प्रमाण कायम राखलें आहे व बाकीच्या सर्व प्रांतांनीं आघाडी मारली आहे. जननाचें प्रमाण वाढलें तरी मृत्युसंख्याहि वाढत गेली; विशेषतः बिहार, ओरिसा, बंगाल, मध्यप्रांत व मुंबई ह्यांस १९४५ साल वाईट गेलें.

## प्राप्तीवरील कर आणि विमा कंपनीचा नफा

आयुर्विमा कंपन्यांवर प्राप्तीवरील कराची आकारणी करतांना कंपनीचा नफा अगर तोटा कसा अजमवावा यासंबंधी एक महत्त्वाचा निर्णय मुंबई हायकोर्टानें नुकताच दिला आहे. प्राप्तीवरील कराच्या कायद्याप्रमाणें विमा कंपनीचें मूल्यमापन झाल्यानंतर जी शिल्लक दिसेल त्यांतून कांहीं विशिष्ट रकमा वजा घातल्यानंतर जी रक्कम उरेल तो कंपनीचा नफा अशी स्थिति आहे. या कायद्याप्रमाणें शिल्लक रकमेंतून विमेदारांना द्यावयाकरितां राखून ठेवलेल्या अगर खर्च केलेल्या रकमेच्या निम्मी रक्कम वजा करतां येते. उरलेली रक्कम कंपनीचा 'नफा असें समजण्यांत येतें. न्यू इंडिया अश्युरन्स कंपनीनें, आपल्या उत्पन्नांतून मुळांत कापली गेलेली प्राप्तीवरील कराची रु. ३३,८६० ची रकम व प्राप्तीवरील कराच्या तरतुदीसाठी राखून ठेवण्यांत आलेली रु. १,००,७५० ही रकम या दोन्ही रकमा विमेदाराकरितां म्हणून दाखविलेल्या होत्या. कोणतीहि रक्कम आयुर्विमाफंडांतून खर्च केली गेली असेल तर ती विमेदारांच्यासाठीच होय असें कंपनीचें म्हणणें होतें. त्यावर हायकोर्टानें असा निकाल दिला कीं, विमेदार व कंपनी यांचे संबंध विमापत्रकांच्या कराराप्रमाणें स्वतंत्रपणें ठरलेले असतात; आणि विमेदारावर कर भरण्याची कायदेशीर जबाबदारी असत नाहीं. शिवाय कंपनी जेव्हां कर देते ती आपल्या स्वतंत्र अस्तित्वाबद्दल देते. भागीदारांची तेव्हां प्रतिनिधी या नात्यानें देत नाहीं. तेव्हां या दोन रकमांची प्राप्तीवरील कराच्या कक्षेंतून सुटका करणें बरोबर नाहीं. कंपनीच्या हिशोबांत रु. १४,४४१ ही जी रक्कम विमेदारांच्या खातीं मागील वर्षांच्या हिशेबावरून पुढें ओढलेली होती ती मात्र प्राप्तीवरील कराच्या कायद्याप्रमाणें कंपनीचा नफा अजमावण्यापूर्वी वजा टाकतां येईल.

---

## अपघात कशाला म्हणावें !

हिंदी कामगारांना वर्कमेन्स् कॉंपेन्सेशन ॲक्टप्रमाणें अपघाताबद्दल नुकसानभरपाई मिळण्याची सोय, कायदा लागू असेल तेथें करण्यांत आलेली आहे. अपघात हा शब्द उच्चारल्याबरोबर ध्यानींमनीं नसतां अनपेक्षित अशी घटना घडून येऊन इजा पोचणें असाच अर्थ मनांत येतो, आणि तो सर्वसाधारणपणें बरोबरच आहे. पण कायद्याच्या व्याख्येंत अपघात कशाला म्हणावें यासंबंधीं काथ्याकूट करण्याचा प्रसंगहि उद्भवूं शकतो. इंग्लंडमधील एका कौंटी कोर्टानें नुकताच असा निवाडा दिला कीं इस्पितळांत काम करणाऱ्या परिचारिकेला क्षयाची बाधा झाल्यास तो अपघातच होय आणि त्याबद्दल परिचारिकेला नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क आहे. 'अपघात' या घटनेची कायदेशीर व्याख्या किती लवचिक असूं शकेल याचें हा निवडा म्हणजे एक उदाहरण होऊं शकेल. उलटपक्षीं कायद्याची काटेकोर चौकट किती कडक रीतीनें निर्बंधित होऊं शकते यासंबंधाचेंहि एक उदाहरण देतां येण्यासारखें आहे. कामगार नुकसानभरपाई कायद्याखालील दुसरा एक निवाडा वरील निवाड्याच्या अगदीं उलट दिला गेला आहे. एका इमारतीवर बांधकाम करणारा एक कामगार होता. त्याचें काम अशा स्वरूपाचें होतें कीं डाव्या हातांत एक हादरे देणारें यंत्र धरावयाचें व उजव्या हातानें त्याची दिशा बदलावयाची. हें काम करतां करतां एका वर्षानें सदर कामगाराच्या बोटांचीं पुढील पेरीं बधिर झालीं व त्याला काम करतां येणें अशक्य झालें. पण कोर्टानें अपघाताची व्याख्या "एकदम व निश्चित परिणाम घडवून आणणारा प्रसंग" अशी केली व या कामगाराला नुकसानभरपाई मिळूं नये असा निकाल दिला. यावर सदर कामगारातर्फे वरिष्ठ कोर्टांत अपील करण्यांत आलें. अपील कोर्टानें मूळ कोर्टाचा निकाल फिरविला व कामगाराला नुकसानभरपाई मिळावी असा निकाल दिला. या निकालाचें कारण सांगतांना अपील कोर्टानें असा युक्तिवाद केला कीं, ज्या यंत्राच्या साह्यानें हा कामगार काम करीत होता, त्या यंत्राच्या थरथरण्यामुळें त्याच्या बोटांचीं पुढील पेरीं हळूहळू निकामी होत चाललीं होतीं. या रोज होणाऱ्या परिणामामुळें कामगार काम करण्यास असमर्थ झाला असला तरी त्यामुळें ही घटना अपघात या सदरांत मोडते.





—दररोज लागणारें ताजें—

**दहीं**

शेरास १० आणे

म. गो. कुलकर्णी

किराणा-भुसार मालाचे व्यापारी,
फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २.

**शेअर्स विकणें आहेत:—**

गोवर्धन डेअरी फार्म्स लि.
गोवर्धनवाडी, पुणें १.

**पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.**

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | "Cencobank" | नं. ११ |

**मुख्य कचेरी:—लक्ष्मीरोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—
जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## सावकारी नियंत्रण कायदा आणि बँका

सावकारी नियंत्रणाच्या कायद्याचा बँकांचे व्यवहारावर काय परिणाम होणार आहे, ह्याकडे त्यांचें पुरेसें लक्ष्य वेधलें गेलेलें दिसत नाहीं. सावकाराच्या व्याख्येंत पैसे कर्जाऊ देणाऱ्या व्यक्ती, अविभक्त हिंदू कुटुंबें, बँका व पेढ्या ही सर्व येतात आणि त्या सर्वांना लायसेन्स काढावा लागणार आहे. कर्जाचे व्याख्येंतून (अ) पो. ऑ. बँक किंवा इतर बँक किंवा कंपनी किंवा सहकारी सोसायटी ह्यांत ठेवलेली ठेव, (ब) सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टाखालीं नोंदलेल्या सोसायटीस किंवा सोसायटीनें दिलेलें कर्ज वा ठेव, (क) सरकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांनीं दिलेलें कर्ज, (ड) सहकारी सोसायटीनें दिलेलें कर्ज (ई) शेड्यूल्ड बँकेनें किंवा बँकेस दिलेलें कर्ज व (फ) प्रॉ. नोट व्यतिरिक्त इतर निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटवर दिलेलें कर्ज, हीं वगळण्यांत आलेलीं आहेत. म्हणजे, बिगर-शेड्यूल्ड बँकांचा दर्जा सामान्य सावकाराचे बरोबरीस आणून ठेवण्यांत आला आहे. वास्तविक रीत्या बँकांचे व्यवहार कित्येक अनिष्ट सावकारी व्यवहाराप्रमाणें भानगडीचे व अवास्तव पैसे मिळविण्याचे सहसा नसतात. त्यांचेवर सावकारी नियंत्रणाचा कायदा लादणें इष्ट होणार नाहीं. बिगर-शेड्यूल्ड बँका सर्व ठिकाणीं विखुरलेल्या असल्याकारणानें त्यांची संघटना होऊन एकजुटीनें त्यांचें म्हणणें मांडलें जाणें कठीण आहे. तरी पण त्यांनीं आपल्या अडचणी योग्य त्या मार्गानें सरकारचे कानावर वेळींच घालणें अगत्याचें आहे.

---

## शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जावरील व्याजाचा दर

मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या वार्षिक सभेंत, बँकेचे चेअरमन श्री. सरय्या, ह्यांनीं बँकेचे उत्पन्न, खर्च व तिचा कारभार ह्यासंबंधीं उद्बोधक माहिती सांगितली. इतर सहकारी बँकांसहि ती उपयुक्त वाटेल. बँकेचें एकूण खेळतें भांडवल गेल्या दोन वर्षांत ६७% वाढलें तरी एकूण उत्पन्न ४१% नेंच वाढलें. व्यवस्था खर्च १९४४ सालीं ५½ लक्ष रु. होता तो १९४६ सालीं ८ लक्ष रु. झाला. नोकरवर्गाचा पगार जुलै १९४५ मध्यें वाढविण्यांत आला व मार्च १९४६ मध्यें त्यांच्या भत्त्यांत वाढ करण्यांत आली. जून, १९४६ नंतर पुनः त्यांत वाढ करण्यांत आली आहे. बँकेनें गुंतविलेल्या रकमांवर ज्यास्त व्याज सुटलें नाहीं, तर कर्जावरील व्याजाच्या दराबाबत आपल्या धोरणाचा फेरविचार करावा लागेल. आजच आपल्या १२ शाखा तोट्यांत चालल्या आहेत. विखुरलेल्या खेड्यांतील लहानसहान कर्जदारांची बँकेनें सेवा करणें किती खर्चाचें असतें, हें शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज उतरविण्यास सांगणाऱ्यांच्या चटकन लक्षांत येत नाहीं. शेतकऱ्यांना कर्जें द्यावयाचीं, म्हणजे अनेकांना लहान लहान रकमा द्याव्या लागतात, अनेक खातीं ठेवावीं लागतात आणि खातेदारांवर देखरेख करून त्यांचे मार्गदर्शन करण्यासाठीं मोठा नोकरवर्ग नेमावा लागतो. बँकांनीं शहरी पेढ्यांना दिलेल्या कर्जावरील व्याजाचा दर आणि खेड्यांतील शेतकऱ्यांच्य कर्जावरील व्याजाचा दर ह्यांची तुलना करतांना ह्या गोष्टी विसर ल्य जातात. श्री. सरय्या ह्यांनीं केलेल्या विवेचनावरून सहकारी बँकांना येत्या एक-दोन वर्षांत कोणत्या परिस्थितींत आपला कारभार करावा लागेल ह्याची चांगली कल्पना येईल.

---

## वापर व घसारा

मोटर्स ॲन्ड जनरल स्टोअर्स लि. बोबिली, मद्रास या कंपनीनें १९४२-४३ या सालांत सर्व वर्षभर इलेक्ट्रिकचें सामान व वीज पुरठ्याचें काम केलें होतें. त्याशिवाय त्याच सालापैकीं २३ जानेवारी ते ३१ मार्च १९४२ या सुमारें सव्वादोन महिन्यांत तेलाची गिरणीहि चालविली होती. परंतु प्राप्तीवरील कराच्या आकारणीचे वेळीं तेलाच्या गिरणीचे यंत्रसामुग्रीबाबत सबंध वर्षाचा घसारा (डिप्रीसिएशन) कंपनीनें आकारला होता. इन्कमटॅक्स ऑफिसरचें म्हणणें पडलें कीं कंपनीला, फक्त तेलाची गिरणी चालू होती तेवढ्या मुदतीचा घसारा वजा घालतां येईल; सबंध वर्षाचा घालतां येणार नाहीं. अपेलेट असिस्टंट कमिशनरनेंहि हाच निर्णय ग्राह्य धरला. मग कंपनीनें ट्रिब्यूनलकडे अपील केलें. ट्रिब्यूनलनें खालील दोन्ही निकाल फिरवून टाकले. तेव्हां कमिशनरच्या सांगण्यावरून ट्रिब्युनलनें मद्रास हायकोर्टाचे निर्णयासाठी सदर प्रश्न पाठविला असतां हायकोर्टानें ट्रिब्यनलचाच निकाल ग्राह्य धरला. तेलाच्या गिरणीची यंत्रसामुग्री सर्व वर्षभर कंपनीच्या ताब्यांत होती व सबंध वर्षांत कंपनीच्या कामाव्यतिरिक्त इतर कामीं तिचा उपयोग केला गेला नाहीं. सबब सर्व वर्षाचा घसारा वजा घालण्यास कंपनीला हरकत नाहीं असा हायकोर्टानें निकाल दिला.

दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी लि.,
हेड ऑफिस : ८६६ सदाशिव पेठ, पुणें २
शाखा:—नागपूर, हुबळी व कराची
वसाहतीच्या योजना:—पुणें, सोलापूर, माझगांव, (बेळगांव)
आकर्षक विम्याच्या योजना, सवलतीचे हप्त्याचे दर व विमेदारांना जास्तींत जास्त फायदा. ह्यासाठीं विमेदार हीच कंपनी नेहमी पसंत करतात.
व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी.
मॅनेजर.
सर्व प्रमुख गांवीं प्रतिनिधी नेमणें आहेत.











पुणें चीफ एजंटस:-
मेसर्स श्री दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक; पुणें



## मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

व्याजवश्ना
+डाइंग रु २५ दि. २६-९-४६
गोकाक रु. ६ दि. २६-१०-४६
नागपूर रु. ७ दि. ४-११-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संदित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २४।९।४६ | बुधवार २५।९।४६ | गुरुवार २६।९।४६ | शुक्रवार २७।९।४६ | सोमवार ३०।९।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २९७०—० | ३०५०—० | ३०१२—८ | २९८२—८ | २९४५—० |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५३३—८ | ५४५—८ | ५३७—९ | ५३५—० | ५२९—० |
| २२२२-८; १८६१-१२ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाइंग | २५० | ३१०७—८ | ३१३५—० | ३०९५ + | ३१०५—० | ३०७७—८ |
| ७०२६ ५६६ | १२-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ९३०—० | ९५८—० | ९४८—० | ९३४ | ९१८ |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ७४०—० | ७६५ | ७५६ | ७४६ | ७३१ |
| ४४३-८; ३६० | ७-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ४२०—० | ४३० | ४२५ | ४१८ | ४०९ |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४२२—० | ४३२ | ४३६ | ४२८ | ४२२ |
| ३३५; २८३-८ | ६-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ४२०—० | ४२६ | ४२४ | ४१३ | ४०५ |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४३०—० | ४५२ | ४४६ | ४४२ | ४३३ |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५—५—० | ५—७—६ | ५—७—६ | ५—६—० | ५—६—६ |
| १७ १०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २३—० | २३—१२ | २३-१२ | २३—४ | २३—१ |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | „ डिफर्डस् | १ | ५—१ | ५—२—६ | ५—२—६ | ५—१—६ | ५—०—६ |
| ७९०; ६४५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ८४२—८ | ८६०—० | ८४७—८ | ८५०—० | ८८१—४ |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | ११० | २४५—८ | २४८—८ | २४४—८ | २४५—८ | २४३—८ |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३२२—० | ३३६—० | ३४१—० | ३३९—० | ३३७—० |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६८०—० | ७१२—८ | ७२०—० | ७०७—८ | ६८८-१२ |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ४६—१२ | ४८—६ | ४८—२ | ४७—६ | ४७—८ |

सोमवार दि. ३०-९-४६ चे भाव

| बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | १९५—० | आंध्र व्हॅली | १९५५-० | अलकॉक | ५७२—८ |
| सेंट्रल | १३१—८ | बॉम्बे ट्रॅम | १३६ | बॉंबे स्टीम | ७२७—८ |
| इंडिया | २४७—८ | टाटा हायड्रो | २२१-८ | न्यू इंडिया | ११३—८ |
| इंपी० | २८८२—८ | टाटा पॉवर | २०२०-० | शिवराजपुर | ५३—८ |
| | ७०७—८ | | | टाटा केमिकल | २३—६ |
| रिझर्व्ह | १५४—८ | | | टाटा ऑईल | ११५—८ |

**लांकडाच्या भुशापासून घरें**—एक देखील झाड न तोडतां अमेरिका एका वर्षात दहा लक्ष लाकडी घरें आतां बांधूं शकेल. एका नवीन पद्धतीनें भुशाचे लहान लहान कण दाबांत घालून त्यापासून पुन्हां लाकूड बनविण्यांत येतें. अमेरिकेंत लाकडाच्या व इतर कारखान्यांमध्यें दरवर्षी २ कोटि टन लांकडाचा भुसा व चुरा निघतो. १ टन लाकडाच्या भुशापासून २,००० चौरसफूट लाकडाच्या फळ्या तयार होतील. हें लाकूड नेहमीच्या लाकडापेक्षां पुष्कळ बाबतींत श्रेष्ठ आहे.

### मिरज स्टेट बँक लि.

२० हजार रु. वसूल भांडवलावर मोठाले डिव्हिडंड देऊनहि वरील बँक आपली मजबुती एकसारखी वाढवीत चालली आहे. ३० जून १९४६ अखेर संपलेल्या वर्षी बँकेस ८०,८७७ रु. निव्वळ नफा झाला. भागीदारांस १४%+६%=२०% डिव्हिडंड देण्यास फक्त ४ हजार रुपये लागतील. ५० हजार रु. रिझर्व फंडांत जाणार आहेत. ठेवींची रक्कम ७८ लाखांवर गेली आहे.

### सांगली स्टेट सें. को. बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल ७१,२२० रु. झालें असून रिझर्व्ह आणि इतर फंड ९४ हजारांवर गेले आहेत. ठेवी-७½ लाखांच्या आहेत.

बँकेनें एकूण १ लक्ष, ८६ हजारांची कर्जे दिली आहेत. वर्ष अखेर बँकेस १०,२२२ रु. निवळ नफा झाला. भागीदारांस द. सा. द. शे. ५ रु. १० आ. डिव्हिडंड देण्यांत येईल, त्यास ४,००० रु. लागतील.

आंध्र खादीचे (म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे)
—एकमेव विक्रेते—
**खादी मन्दिर**
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें













श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।७ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि घर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद गोविंद काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें